**प्रेस नोट** **दिनांक २९/०३/२०२६**

**<u>कुरार पोलीस ठाणे गु.र.क्र ४०१ /२०१८ कलम ३७६ (ए) (बी), ३५४, ३४२, ३२३, ५०६ भादवि सह ६,८,१२ पोक्सो २०१२ कायदा मधील आरोपी नामे राकेश विजयनाथ सरोज वय ३५ वर्षे यांस गुन्हयात दोषसिध्दी झालेबाबत...</u>**

कुरार पोलीस ठाणेस हददीत दिनांक ११/०७/२०१८ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून गु.र.क्र. ४०१/२०१८ कलम ३७६ (ए) (बी), ३५४, ३४२, ३२३, ५०६ भादवि सह ६ ,८, १२ पोक्सो २०१२ कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात आरोपी नामे राकेश विजयनाथ सरोज वय २८ वर्षे यांस दिनांक १३/०७/२०१८ रोजी गुन्हयात अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक मुंकुद पाटील यांनी सखोल तपास करून आरोपीविरूध्द सबळ पुरावा गोळा करून मा. विशेष सत्र न्यायालय, दिडोशी कोर्ट, गोरेगांव, मुंबई येथे दोषोराप पत्र स्पेशल केस क्र ४१९/१८ अन्वये सादर करण्यात आले होते.

दिनांक- २७/०३/२०२६ रोजी कुरार पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ४०१/२०१८ कलम ३७६ ३५४, ५०६ (२)भा.द.वि सह कलम ८,१०,१२ पोक्सो - २०१२ कायदा स्पेशल केस क्र ४१९/१८ मध्ये अंतिम सुनावणी होवुन माननीय सत्र न्यायाधीश सौ. ए. डी. लोखंडे, कोर्ट क्रमांक-१३ वे यांनी अटक आरोपी नामे राकेश विजयनाथ सरोज ३५ वर्ष यास १) कलम ३४२ भादवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सशक्त कारावास, २) कलम ३५४ मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सशक्त कारावास ,३) कलम ३२३ मध्ये ०६ महिने सश्रम कारावास व ५०० रुपये दंड व दंड न भरल्यास ०८ दिवस सशक्त कारावास, ४) कलम ५०६ मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सशक्त कारावास , ५) कलम ६ पोक्सो ॲक्ट मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ०३ महिने सशक्त कारावास , ६) कलम ८ पोक्सो ॲक्ट मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व ३ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास २ महिने सशक्त कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

नमुद खटल्यामध्ये माननीय सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री अमित देवतरसे व सौ. उषा जाधव मॅडम यांनी काम पाहिले आहे. मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुबई , मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१२, मुंबई, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, समतानगर विभाग, मुंबई प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश पाटील व पोलीस निरीक्षक श्री. वेदपाठक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी पो.उ.नि. मंगेश सांगळे व म.पो.ह. ०३५५५/कदम, पो.शि. १३०१५९/जाधव यांनी कोर्टाचे कामकाज पाहिले. समन्स वॉरंटचे पो.ह. सुरवाडे व पो.शि.शेख तसेच पो.नि.गुन्हे मदतनीस आदवडे यांनी उत्कृष्ठ व चांगले कामकाज केले आहे.

..............................

Scanned with OKEN Scanner